Circular Marathi

# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक

No.HRDC/ICC/2022-23/६

**संदर्भ- क्र.मासंविक/आयसीडी/२०२१-२२/१८, दिनांक - ०१ नोव्हेंबर, २०२१**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर. ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग उपपरिसरांचे संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकानुसार विभागातील विनापरवानगी (प्रसुती रजा वगळता) दिर्घकालीन अनधिकृत गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या रजेचा तपशिलवार अहवाल व कार्यालयाने केलेल्या कारवाईची कागदपत्रे सहायक कुलसचिव-१ व सहायक कुलसचिव- २, मानव संसाधन विकास कक्ष यांना दि. २२ नोव्हेंबर, २०२१ पुर्वी कळविण्यात यावा. आपल्या विभागाचा अहवाल/माहिती प्राप्त न झाल्यास विभाग प्रमुख म्हणून आपण जबाबदार रहाल याबाबत अवगत करण्यात आले होते.

तरी या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, सेवापुस्तकांची पडताळणी केली असता असे निर्दशनास येते की, अनेक कर्मचाऱ्यांच्या रजेचे मूळ अर्ज विभाग प्रमुखांच्या शिफारशीनुसार या विभागास प्राप्त न झाल्याने बऱ्यांच वर्षांच्या रजेच्या नोंदी सेवापुस्तकात करणे प्रलंबित आहेत. तरी सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना अवगत करण्यात येते की, त्यांचे प्रलंबित रजेचे अर्ज विभागप्रमुखांच्या शिफारशीने या विभागास लवकरात लवकर सादर करावे. तसेच भविष्यात घेणाऱ्या रजेचे अर्ज विभागप्रमुखांच्या शिफारशीने त्या महिन्याच्या हजेरी अहवालासोबत या विभागास सादर करावेत. या पुढे कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या रजेचे अर्ज प्रलंबित राहील्याने काही नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचारी/ अधिकारी व विभागप्रमुख जबाबदार राहतील.

सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

१२ जून, २०२२
मुंबई - ४०००३२

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

Circular Marathi

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,

सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,

विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,

संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,

संचालक, रत्नागिरी उपपरिसर,

संचालक, ठाणे उपपरिसर,

संचालक, सिंधुदुर्ग उपपरिसर,

सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,

विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित -

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय.
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर , विद्यानगरी परिसर, रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग उपपरिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी, तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकारी.
७. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.
८. उद्यान अधिक्षक/अधिक्षक (तांत्रिक) , विधी विभाग
९. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) प्र-कुलगुरु(३) कुलसचिव (४) वित्त व लेखा अधिकारी (५) संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित -

१. सचिव, उ.मा.सा.
२. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स व वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
३. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ.
४. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.
५. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ